महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

बुधवार ❖ ११ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक १६६ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# 'दुर्गाडी किल्ला' राज्य शासनाच्या मालकीचाच





## कल्याण दिवाणी न्यायालयाने फेटाळला मुस्लिम संघटनेचा दावा
## तब्बल चार दशकानंतर आला ऐतिहासिक निकाल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** ऐतिहासिक कल्याण नगरीची सांस्कृतिक ओळख असलेल्या दुर्गाडी किल्ल्याच्या मालकीबाबत कल्याणच्या दिवाणी न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे. दुर्गाडी किल्ल्याची जागा ही राज्य शासनाच्याच मालकीची असण्यावर शिक्कामोर्तब करत या दुर्गाडी किल्ल्यावरील मुस्लिम संघटनेच्या मालकीचा दावा न्यायालयाने फेटाळल्याची माहिती सरकारी वकील ॲड.सचिन कुलकर्णी यांनी पत्राकारांना दिली.

कल्याण न्यायालयाच्या या निकालानंतर शिवसेना, भाजपसह अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत करत संपूर्ण न्यायव्यवस्थेचे आभार मानले आहेत. विशेष म्हणजे गेल्या साडेचार दशकांहून अधिक काळापासून दुर्गाडी किल्ल्याच्या मालकीबाबतचा हा खटला सुरू होता. याठिकाणी असणारे मुस्लिमधर्मियांचे प्रार्थनास्थळ असल्याचे सांगत मुस्लिम समुदायाच्या वतीने मजलिस ए मुशावरा ट्रस्टकडून दुर्गाडी किल्ल्याच्या जागेवर मालकी हक्क सांगण्यात आला होता.

मात्र कल्याण न्यायालया तील वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश ए. एस. लांजेवार यांनी मजलिस ए मुशायरा ट्रस्टकडून मुदतबाह्य कालावधीत हा दावा दाखल करण्यात आल्याचे सांगत त्यांचा मालकी हक्क फेटाळून लावला. आणि दुर्गाडी किल्ल्याची जागा ही शासनाच्याच मालकीची असल्याच्या मुद्द्यावर शिक्कमोर्तब केल्याची माहिती सरकारी वकील ॲड सचिन कुलकर्णी यांनी दिली.

# देवेंद्र फडणवीसांची १.५ लाख सरकारी नोकऱ्यांची घोषणा




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :** मुख्यमंत्रिपदाची सुत्रे हातात घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे ॲक्शन मोडवर आले आहेत. आपल्या सरकारची पुढील दिशा कशी असेल, याबाबत सोमवारी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलंय. नोकरी-रोजगार उपलब्ध करण्यासाठी अनेक योजना राबवण्यासाठी त्यांनी रूपरेषा तयार केली आहे.

दीड लाख नोकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिले आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने याबाबतचे वृत्त दिले आहे. राज्यात विविध योजना राबवण्यासह तरूणांना सरकारी नोकरी मिळेल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राज्यातील तरूणांसाठी लवकरच १.५ लाख रोजगार उपलब्ध करण्यात येतील, त्यासाठी भरती प्रक्रिया राबवण्यात यावी, असे आदेश त्यांनी सोमवारी दिल्याचं समोर आलेय. त्यामुळे लवकरच बंपर सरकारी नोकऱ्या राज्यातील तरूणांसाठी उपलब्ध होतील, असे म्हटलंय जातेय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले ? 'आधीच्या सरकारी कर्मचाऱ्यांची बढती प्रक्रिया पूर्ण करा. नंतर नवीन भरती प्रक्रिया पूर्ण करण्यास सुरूवात करा. तसेच नवीन भरती आणि विद्यमान कर्मचाऱ्यांना डोमेन ज्ञान आणि तंत्रज्ञान अवलंबन यावर लक्ष केंद्रीत करणारे सर्वसमावेशक प्रशिक्षण मॉड्यूल विकसित करा, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.' सरकारी कर्मचाऱ्यांबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणतात, 'सरकारी कर्मचाऱ्यांना अधिक वेळ फिल्डमध्ये घालवावं लागेल. जिल्ह्यांमध्ये सचिवांच्या भेटींसाठी तपशीलवार वेळापत्रक तयार करा. सरकारी कार्यक्रम आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय समन्वय यंत्रणा मजबूत करा.' मंजूर झालेल्या प्रकल्पांमुळे १.२ लाख लोकांना मिळणार रोजगार गेल्या ८ महिन्यात मंजूर झालेल्या प्रकल्पांमधून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ३.३ लाख कोटी रूपयांची गुंतवणूक झाली आहे. यामधून १.२ लाख नोकऱ्या उपलब्ध होतील, असे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी विधानभवनातील आपल्या भाषणात सांगितलं. ते म्हणाले, 'सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने, एरोस्पेस आणि डिफेन्स, केमिकल्स आणि पॉलिमर्स, लिथियम आयर्न बॅटरी अँड स्टील यांसारख्या हाय टेक प्रकल्पांना 'अँकर इंडस्ट्री'चे दर्जा देण्याचे धोरण सरकारने दिले आहे. ज्यामुळे लोकांसाठी रोजगार निर्माण होईल.'

मुंबई डेटा सेंटरची राजधानी पुढे राज्यपाल म्हणतात, 'सरकारने माहिती तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञान समर्थित सेवा धोरण आणि ग्रीन डेटा सेंटर धोरण जाहीर केले आहे. ज्याचे उद्दिष्ट मुंबईला भारताची डेटा सेंटर राजधानी बनवण्याचे आहे. या धोरणाचा एक भाग म्हणून, मुंबई आणि नवी मुंबईमध्ये ग्रीन इंटिग्रेटेड डेटा सेंटर पार्क उभारले जाईल. ज्यामुळे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल आणि २० हजार लोकांसाठी रोजगार निर्माण होईल.

# कुर्ला बस अपघातात मृतांचा आकडा ६ वर

## मृतांची संख्या ६ ; जखमींची संख्या ४९




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :** मुंबईतील कुर्ला येथे झालेल्या 'बेस्ट' बसच्या अपघातामध्ये मृतांची संख्या वाढली आहे. सोमवारी रात्री या अपघातामध्ये तीन जण दगावल्याची माहिती समोर आली होती. मात्र उपचारादरम्यान तीन जखमी व्यक्तीचा मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा सहा वर पोहोचला आहे. या अपघातामध्ये ४९ जण जखमी झाले आहेत. नियंत्रण सुटलेल्या बसने अनेक पादचाऱ्यांबरोबरच वाहनांनाही धडक दिल्याचं पाहायला मिळालं.

एस. जी. बर्वे मार्गावर हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पिलरला धडकली वाहने बृहन्मुंबई इलेक्ट्रीसिटी सप्लाय ॲण्ड ट्रान्सपोर्ट म्हणजेच 'बेस्ट'ची अपघातग्रस्त बस कर्त्यावरुन अंधेरीला जात असतानाच हा अपघात कुर्ला पश्चिम येथे घडला.

या भरधाव वेगातील बसने ३० ते ४० वाहनांना घडक दिली. काही वाहने अगदी १०० मीटरपर्यंत फरफटत नेली.

ही बस इतकी वेगात होती की तिने धडक दिलेल्या गाड्या रस्त्याच्या बाजूला काम सुरु असलेल्या बांधकाम सुरु असलेल्या पिलरवर आदळून अगदी चक्काचूर झाल्या. या इमारतीची सुरक्षा भिंत तोडून धडक बसलेली वाहनं त्याखाली दबली गेली.

**पोलिसांनी काय सांगितलं?**

'कुर्त्यामध्ये बसवरील नियंत्रण सुटल्याने बसने काही वाहने चिरडली. २५ लोक यामध्ये जखमी झाले असून मृतांची संख्या ४ वर पोहोचली आहे. जखमींवर रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत. या प्रकरणामध्ये बस चालकाला ताब्यात घेण्यात आलं आहे. या प्रकरणाचा तपास आम्ही करत आहोत,' अशी माहिती झोन ५ चे उपायुक्त गणेश गावडे यांनी रात्री उशीरा प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. जखमींना महानगरपालिकेच्या भाभा रुग्णालयाबरोबरच सायन रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. भाभा रुग्णालयातील डॉक्टर पद्मश्री आहिरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ जणांना उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. यापैकी दोघांना दाखल केलं तेव्हाच त्यांचा मृत्यू झाला होता तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यानंतर मंगळवारी सकाळी मृतांची तसेच जखमींची संख्या अधिक असल्याची माहिती समोर आली असून शेवटची माहिती हाती आली तेव्हा मृतांची संख्या ६ वर पोहचली असून जखमींची संख्या ४९ वर पोहचली आहे. सखोल चौकशीची मागणी बसचा ब्रेक फेल झाल्यामुळे हा अपघात झाला असल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. बेस्टच्या मार्ग क्रमांक ३३२ वरील ही बस होती. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या, माहितीनुसार काही जणांचा अपघातस्थळीच मृत्यू झाला. कुर्त्यातील बेस्ट बसच्या अपघातासंदर्भात बोलताना काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी दुखः व्यक्त केलं आहे. आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरुन पोस्ट करताना वर्षा गायकवाड यांनी 'ही दुर्घटना धक्कादायक आणि चिंताजनक असून याची सखोल चौकशी झाली पाहिजे,' अशी मागणी केली. रात्री पाऊणे दहाच्या सुमारास ही दुर्घटना घडल्यानंतर या ठिकाणी एकच गोंधळ उडाला. रस्त्यावरील गोंधळाचे अनेक व्हिडीओ सध्या समोर आले आहेत.

# डोंबिवलीतील मालमत्ता कर थकबाकीदारांच्या गाळ्यांना टाळे




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :** वारंवार नोटिसा पाठवूनही अनेक वर्षाच्या थकीत मालमत्ता कराची ४० लाखाहून अधिक रकमेची थकबाकी भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या चार थकबाकीदारांच्या गाळयांना टाळे लावण्याची कारवाई कल्याण डोंबिवली पालिकेच्या ग प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी केली. या दुकानांच्या मालमत्ता कराची थकित रक्कम मालमत्ता धारकांनी विहित वेळेत भरणा केली नाही तर गाळयांवर जप्तीची कारवाई करून त्यांचा लिलाव करण्यात येईल, असे ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी सांगितले.

डोंबिवलीत ग प्रभाग हद्दीतील दत्तनगर भागातातील दोन गाळेधारकांकडे मालमत्ता कराची एकूण ३४ लाख ३९ हजार ७६७ रुपयांची थकबाकी आहे. उर्सेकरवाडीतील भागातील दोन गाळे धारकांकडे पाच लाख ६६ हजार रुपयांची थकबाकी आहे. ही कराची थकित रक्कम भरणा करण्यासाठी मालमत्ता कर विभागाने मालमत्ता करधारकांना वेळोवेळी नोटिसा पाठविल्या. त्यांच्याकडून विहित वेळेत कर भरणा करण्याची प्रक्रिया करण्यात आली नाही. चार गाळयांचे मालक मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करत असल्याने मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांच्या आदेशावरून ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, अधीक्षक ज्ञानेश्वर कंखरे, लिपिक गोविंद पोटे, प्रभाकर कदम, भीमराव बडेकर यांच्या उपस्थितीत चार गाळयांना टाळे लावण्याची कारवाई केली.

**मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. मालमत्ता कर थकबाकीदारांना पहिले कर भरण्यासाठी नोटिसा पाठविल्या जातात. या नोटिसांप्रमाणे थकबाकीदारांनी कर भरणा केला नाहीतर तर त्यांच्या मालमत्तांना टाळे लावण्यात येते. कर थकबाकीदारांनी कारवाई टाळण्यासाठी लवकरात लवकर कर भरणा करावा.**
**- संजयकुमार कुमावत, साहाय्यक आयुक्त, ग प्रभाग, डोंबिवली.**

# वनविभागाचे दुर्लक्ष
# रस्त्यालगतची झाडे आगीत भस्मसात



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता टिटवाळा(प्रतिनिधी) :** कल्याण-टिटवाळा, टिटवाळा आंबिवली रिंगरोडवर (९० फुट) रस्त्याच्या दुतर्फा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या माध्यमातून इंडीयन मेडीकल असोसिएशन कल्याण, कल्याण संस्कृती मंच, केडीएमसी आणि आदींच्या सहकार्यातून लावलेली झाडे आगीत जळून खाक झाली आहेत. पावसाळयानंतर झाडांच्या आजूबाजूच्या गवताची निगा न राखल्यामुळे सुकलेल्या गवताला लागलेल्या आगीमुळे संपूर्ण झाडे ही जळून खाक झाली आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगर-पालिकेच्या उद्यान विभागाच्या माध्यमातून आणि विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मागील वर्षी आगस्ट महिन्यात या ठिकाणी वृक्षारोपन करण्यात आले होते. वृक्षारोपण केले जाते. मात्र त्यांची योग्य निगा राखली जात नाही. नेमके या झाडांना आग कशी लागते? याला जबाबदार कोण ? झाडांना आग लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी गेली अनेक वर्ष भरीव कामगिरी करणाऱ्या पर्यावरण दक्षता मंडळाच्या संस्थापिका संगीता जोशी यांनी सांगितले की महापालिकेबरोबरच आपल्या सर्व नागरिकांची देखील जबाबदारी आहेय की झाडे असलेल्या ठिकाणी वावरताना त्यांना हानी होणार नाही तसेच पर्यावरणाला बाधा येणार नाही यासाठी काळजी घ्यावी आणि असे कृत्य करताना कोणी आढळल्यास त्याला प्रतिबंध केला पाहिजे.

# काळा तलाव साफसफाईत दिरंगाई ठेकेदाराला नोटीस

## आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** येथील पश्चिमेतील काळा तलाव परिसरातील दैनंदिन साफसफाईत दिरंगाई केल्याने कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी येथील स्वच्छतेचे काम पाहणाऱ्या ठेकेदाराला ठेका रद्द करण्याची नोटीस बजावली आहे. ठेकेदार नियुक्तीसाठी नव्याने निवीदा प्रक्रिया राबवून काळा तलाव आणि परिसरातील स्वच्छतेचे काम पाहण्यासाठी नवीन ठेकेदार नियुक्त केला जाईल, असे आयुक्त डॉ. जाखड यांनी ध्वनीचित्रफितीद्वारे माध्यमांना दिलेल्या माहितीत जाहीर केले आहे.

कल्याण पश्चिमेतील सौंदर्यीकरण करण्यात आलेल्या काळा तलाव (भगवा तलाव) भागात दररोज सकाळ, संध्याकाळ नागरिक फिरण्यासाठी येतात. मनोरंजनाची साधने येथे आहेत. ज्येष्ठ, वृद्ध मंडळी आपल्या नातवंडांसह येथे येतात. कल्याणमधील एक विरंगुळयाचे ठिकाण म्हणून काळा तलाव ओळखला जातो. शिवसेनाप्रमुखांचे स्मारक येथे आहे. चालण्यासाठी गोलाकार मार्गिका, बगिचा येथे आहे. या सर्व सुविधांची देखभाल करण्यासाठी पालिकेने एक ठेकेदार नियुक्त केला आहे. या ठेकेदारावर येथील स्वच्छतेची जबाबदारी सोपविण्यात आली होती. गेल्या एक महिन्यापासून काळा तलाव परिसरात साफसफाई केली जात नव्हती. झाडांना पाणी टाकण्यात येत नसल्याने झाडे सुकत चालली होती. सुरक्षा रक्षक त्यांची जबाबदारी योग्यरितीने पाडत नसल्याच्या तक्रारी वाढत होत्या. येथील ध्वनीक्षेपण यंत्रणा बंद पडली आहे. या दैनंदिन कचऱ्यामुळे नागरिकांनी माजी नगरेसवक सुधीर बासरे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. माजी नगरसेवक सुधीर बासरे यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना पत्र लिहून काळा तलाव स्वच्छतेमध्ये दिरंगाई करणाऱ्या ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याची मागणी केली होती. गेल्या दहा वर्षांपासून या ठिकाणी ज्या स्पर्धात्मक पद्धतीने ठेकेदार नियुक्त केला जात होता. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची मागणी केली होती. अनेक जागरूक नागरिकांनी काळा तलाव येथील साफसफाईच्या दिरंगाईसंदर्भात आयुक्तांकडे तक्रारी केल्या होत्या. आयुक्तांनी या सर्व तक्रारींची दखल घेऊन काळा तलाव ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याची कार्यवाही केली. तसेच पालिकेच्या सफाई कामगारांकडून याठिकाणी दैनंदिन स्वच्छता होईल यादृष्टीने नियोजन केले. नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी निवीदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश दिले.

**काळा तलाव येथे दैनंदिन स्वच्छता केली जात नसल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे येथे काम करणाऱ्या ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याची कार्यवाही केली. पालिका पथकाकडून याठिकाणी नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत दैनंदिन स्वच्छता केली जातील.**
**- डॉ. इंदुराणी जाखड, आयुक्त.**

# ज्येष्ठ कट्टर शिवसैनिक रमाकांत मुसलोणकर (वैद्य)यांचे निधन



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :**

ज्येष्ठ कट्टर शिवसैनिक रमाकांत मुसलोणकर (वैद्य), राहणार एमआयडीसी निवासी, डोंबिवली यांचे आज मंगळवारी सकाळी वयाच्या ७९ वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. कुठलेही पद न घेता किंवा पदाची अपेक्षा न बाळगता त्यांनी शिवसैनिक म्हणुन काम केले. नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला यश न मिळाल्याने ते अस्वस्थ झाले होते. त्यांनी ही व्यथा घरच्यांना आणि शिवसैनिकांना बोलून दाखविली होती. आज सकाळी झोपेतच त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते नोसिल या कंपनीत नोकरी करून निवृत्त झाले होते. त्यांच्यावर आज दुपारी डोंबिवलीच्या शिवमंदिर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, सून आणि नातू असा परिवार आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

# बांगलादेशातील हिंदूंवर होणा-या आक्रमणांवर विविध संघटनांनी पेण येथे केले आंदोलन



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी) :**

बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी कायदेशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या बांगल देशातील इस्कॉनचे प्रमुख स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अन्याय करून अटक करण्यात आली आहे. ही अटक म्हणजे हिंदू अल्पसंख्याकांचे हक्क दडपण्याचा आणखी एक प्रकार आहे, याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो.तसेच भारत सरकारने तातडीने पावले उचलून चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांची विनाअट सुटका व्हावी आणि हिंदू अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी तेथील सरकारला भाग पाडावे, अशी मागणी हिंदू राष्ट्र समन्वय समितीच्या माध्यमातून पेण येथील नगर पालिका कोतवाल चौकात झालेल्या आंदोलनात करण्यात आली. 'हिंदु राष्ट्र समन्वय समिती'च्या वतीने घेण्यात आलेल्या या आंदोलनात इस्कॉन, विश्व हिंदु परिषद, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान,गोरक्षक मंगल पाटील गोशाळा, हिंदु जनजागृती समिती, सनातन संस्था आदी हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याप्रसंगी आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदूंनी हातात प्रबोधनपर फलक धरले होते आणि घोषणाही देण्यात आल्या. या वेळी केंद्र शासनाला देण्यात येणाऱ्या निवेदनावर लोकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. आंदोलनात बोलताना हिंदू जनजागृती समितीचे सुनील कदम म्हणाले, की प्रलय काळात याच इस्कॉनने नागरिकांना अन्न मिळावं त्यासाठी मंदिरामध्ये जेवण दिले होते. आज त्याच इस्कॉनच्या मंदिरांवर आक्रमण केले जात आहेत. जगात कुठेही हिंदूंवर अन्याय-अत्याचार होत असेल तर त्याचा पाठीशी उभे राहणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे आपल्या भारतातील हिंदूंचे कर्तव्य आहे.तर इस्कॉनच्या साधिका सौ. मीनाक्षी पाटील यांनी सांगितले की बांगल देशात हिंदूंना जागृत करण्याचे कार्य केले म्हणून चिन्मय कृष्णदास प्रभूजी यांना अटक करण्यात आली. त्यांना वकील न मिळण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आपल्या रक्षणासाठी आपण वेळीच संघटित होऊ या, अन्यथा भविष्यात एकत्र येणे अशक्य होईल.

बांगला देशातील हिंदूंवर होणाऱ्या आत्याचाराच्या विरोधात कारवाई करण्यासाठी हिंदूंनी संघटीत होऊन भारत सरकारवर दबाव निर्माण करूया असेही सांगितले.

यावेळी अधिवक्ता गणेश म्हात्रे आणि दिघाटी गावचे माजी सरपंच रोहिदास शेडगे यांनीही आपले विचार मांडले.

बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांवरील अन्याय भारतासाठी केवळ शेजारील प्रश्न नसून हिंदूंच्या अस्तित्वाचा, मानवाधिकार आणि धर्मस्वातंत्र्याचा संवेदनशील विषय आहे. हिंदूंवरील हे अत्याचार रोखले नाही, तर त्याचे लोण भारतात येण्यास वेळ लागणार नाही; म्हणून हिंदूंना भारत सरकारकडून कठोर भूमिका आणि निर्णायक पावले उचलण्याची अपेक्षाही हिंदूनी व्यक्त केली आहे.

# टोकावडे पोलीस ठाण्यात मानवी हक्क दिनाची जनजागृती



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

१० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून राज्यात कायमस्वरुपी साजरा केला जातो.

या वर्षी मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणा आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. सदरील कायादद्यांतर्गत समाजतील तळागाळापर्यत जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहित होणे व त्याबद्दल जनजागृती करीता टोकावडे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर चकोर यांनी हद्दीतील पोलीस पाटील यांना पोलीस ठाण्यात बोलवुन सदर बाबत माहिती देण्यात आली.

तसेच महात्मा गांधी विद्यालय व कला, विज्ञान व्यवसाय कनिष्ठ महाविद्यालय धसई येथे विद्यार्थ्यांना मानवी हक्क दिवस याबाबत सविस्तर प्रबोधन करून विद्यार्थ्यांना माहिती दिली.

# बोगस इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करणाऱ्या कंपनीच्या सूत्रधारास महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवाकर विभागाकडून अटक

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी)**

शासनाच्या वस्तू व सेवाकर विभागाकडून वस्तू व सेवाकर चुकवेगिरी संदर्भात सुरु असलेल्या धडक मोहिमेअंतर्गत मे. एसपीजी मल्टी ट्रेड प्रा.लि. या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रिन्स गोयल, वय ५३ वर्षे यांस दि. ०२ डिसेंबर २०२४ रोजी अटक करण्यात आली असल्याची माहिती राज्यकर उपआयुक्त यांनी दिली आहे.मे. एसपीजी मल्टी ट्रेड प्रा.लि. या कंपनीवर वस्तू व सेवा कर विभागाकडून अन्वेषण कार्यवाही सुरू करण्यात आली होती. या संदर्भातील तपासात कंपनी प्रत्यक्षात कोणत्याही वस्तू व सेवांचा पुरवठा न करता खोटी बिले आणि बोगस वाहतूक पावत्या जारी करत असल्याचे आढळून आले. त्याद्वारे कंपनीने रूपये ६४.०६ कोटीच्या इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करून शासनाची फसवणूक केली आहे. मे. एसपीजी मल्टी ट्रेड प्रा.लि. या कंपनीच्या सर्व कामकाजास व व्यवहारास जबाबदार असल्यामुळे प्रिन्स गोयल यांचा या फसवणूकीत प्रत्यक्ष सहभाग असल्याचे आढळून आहे. ही संपूर्ण कार्यवाही षण्मुगाराजन एस. (भा.प्र.से.), राज्यकर सहआयुक्त, अन्वेषण-क तसेच नयना गोंदावले, राज्यकर उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली,विलास नाईक आणि अजित विशे, सहायक राज्यकर आयुक्त यांच्याकडून संयुक्तपणे राबविण्यात आली. या कार्यवाहीत राज्यकर निरीक्षकांचे उल्लेखनीय योगदान आहे.सन २०२४-२५ मध्ये केलेल्या या ९ व्या अटकेद्वारे महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागाने कर चुकवेगिरी करणाऱ्यांना कठोर इशारा देण्यात आला आहे.

# स्वर्गीय दिलीप पाटीलांच्या रूपाने मी पाहिलेला संघर्ष योद्धा

**-सि.आर म्हात्रे**

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

लोक माणसात देव शोधतात,देव तर कोणी पाहिलेला नाही.तो कधी देव्हाऱ्यात पाहतो ,कधी मंदिरात,कधी झाडात,कधी पशुत,कधी पक्षात,तर कधी माणसात,हो तोच मी या माणसात पहिला तो ,संघर्ष योद्धा दिलीप पाटील यांच्या रूपात.

१९८४ पासून गावची नाळ खऱ्या अर्थाने जुळली होती ..पण बदली नंतर पुन्हा २०१६ मध्ये पुन्हा गावात आल्यावर पुन्हा दुसऱ्या पिढीत ओळख निर्माण करता येऊ लागली.त्यातच ब.ग . ठाकूर विद्यालयात त्यांची प्रथम ओळख झाली .आणि त्यांनी आपल्या भोईर मामांच्या स्मरणार्थ शाळेत एक पारितोषिक ठेवले.पहा एक वेगळं उदाहरण.आणि तिथूनच आमची मैत्री वाढू लागली,आणि निवृती नंतर अचानक या योद्या बरोबर,आंदोलनात सहभागी होण्याचे भाग्य लाभले.

२०१७ नंतर नवीन पाइप लाईन(ब्लॅक पाइप) टाकताना त्यांचे मार्गदर्शन अधिकाऱ्यांना लाभले होते. अगदी वाशी नाका येथील नवीन वॉल बसवत असताना सोबत होते. सतत आंदोलन पाण्यासाठी करता करता यश आले नाही .ही खंत त्यांना राहिली . बऱ्याच वेळा ही खंत बोलून दाखविली. त्यांनी पण मान्य केली..माझ्यावर खारे पाट विभागाला पाणी देता आले नाही म्हणून अपयश वाट्याला आले.सेझ विषयी मंत्रालयात विखेपाटील,आमदार रवींद्र पाटील, खासदार धैर्यशील पाटील माजी आमदार,जयंत पाटील आणि सेझ संघर्ष समिती यांच्या बरोबर बैठक करण्याचे भाग्य स्वर्गीय दिलीप पाटील यांच्या मुळे लाभले...गेल पाइप लाइन अधिकारी यांच्या सोबतच्या बैठकीत भाग घेता आले.. खासदार सुनील तटकरे यांना सेझ,गेल,रेल्वे या संदर्भात सुतारवाडी येथे जाऊन लक्ष देण्याबाबत वेळोवेळी सांगितले होते. गावोगाव बैठका घेताना नवीन नवीन व्यक्तींना आपली भूमिका समजावताना त्यांचा आत्मविश्वास वाखण्याजोगा होता.भर उन्हात,भर पावसात खार बंधारा कसा निकृष्ट आहे हे लाईव्ह अधिकारी वर्ग यांच्या बरोबर घेतलेला फंगा आपण पाहिलेले आहेच.मला नेहमी म्हणायचे सर आपल्यावर अन्याय होत असेल तर पक्ष,राजकारणी,नेते यांची मी तमा बाळगणार नाही.सर्वच पक्ष यांच्यातील नेते दिलीप पाटील याना मान देत होते...

सर आपल्याला आत्ता सत्तेतून विकास करून घ्यायचा आहे...तरणखोप पासून



भाल पर्यंतची जलवाहिनी पूर्ण करायची आहे.हे त्यांचे स्वप्न मात्र स्वप्नच राहते असे वाटू लागले आहे.

एक हाडाचा शेतकरी म्हणून काम करताना पहिलं आहे.लावणी ते मळणी पर्यंत आपल्या सहचरणी सोबत करताना आपण सर्वांनीच पहिलं आहे आत्ता मात्र त्या माऊलीला या प्रसंगातून जायचे आहे.खरंच त्यांना खरी साथ माऊलीची होती.पूर्ण कुटुंबवत्सल असा धीरोदात्त वल्ली होता..नाटक असो वा तालमी असो ते झोकून द्यायचे. कोरोणा काळातील त्यांचे उपोषण,त्यांचे सहकारी यांनी जीवाची पर्वा केली नाही.पण २४ तास पाणी काही मिळाले नाही,आणि शक्यताही दिसत नाही.नाटकांनी त्यांच्यावर जणू अधिराज्य गाजवले होते.कोणत्याही तालुक्यात जाण्याची त्यांची तयारी असायची.नाटक झाला पाहिजे. जिवंत कला आहे. ती जोपासली पाहिजे. विविध नाटकातील त्यांच्या भूमिका त्यांना अजरामर करून ठेवल्या आहेत.त्यांच्या सोबत काम करणाऱ्या कलाकारांनी त्यांचा भावना व्यक्त करताना निदर्शनात आले..कोविड काळात त्यांनी आपली डिंपल ड्रम कंपनी चालू ठेऊन कामगारांच्या रोजी रोटीचा प्रश्न मालकांना सांगून मार्गी लावला होता.कित्येक अनुभव आहेत,कधीमधी कोणाच्या भावना दुखावल्या तर माफी मागायला तयार असायचे. त्यांचा नेहमीचा प्रणाम दंडवत च लोगो असायचा तो यापुढे दिसणार नाही.. त्यांनाच कायमचा दंडवत घालण्याची परिस्थिती दिलीप पाटील यांनी सर्व समाज बांधव यांच्यावर आणली.त्यांची जोडगोळी म्हणजे दिलीप भाई...आणि काशिनाथ पाटील. बंधू भावापेक्षाही पलीकडचे त्यांचे नाते मी पाहिले आहे. सेझ असो व गेल असो.

समोर आडवे होणार म्हणजे होणार. एक जहाल तर दुसरे थोडे मवाळ..पण जोडीच..सोबत असल्याखेरीज कोणतीही मीटिंग नाही,मग ती कोठेही असो.. खरे एकाकी काशिनाथ पाटील पडलेत,पण त्यांनी त्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी झटले पाहिजे ,सर्वांची साथ लाभेल अशी आम्ही ग्वाही देतो.. त्यांचे हिंदू धर्माचे सर्वच धार्मिक कार्यक्रम साजरे करण्याची हातोटी वेगळी होती कारण सर्वच कुटुंबिय एकत्र असायचे. एकच ध्यास समाजाचा अडचणी विना विकास हे त्यांचे ब्रीद होते.सर्व बैठकांचे आयोजन आपल्या घरी करायचे आणि त्याचा त्रास कधीही आम्हा नागरिकांना जाणवला नाही,कुटुंबाची साथ त्यांना मोलाची होती.मी त्यांना नेहमी म्हणायचो आत्ता आराम करा जरा सकाळपासून किती व्यग्र असता.स्वतःकडे पहा,कोणी कोणाचा नसतो ज्यांच्यासाठी तुम्ही करता त्यांनी तुमच्यासाठी केले नाही बघा.पण सर मी आधीही कोणाचा मिंधा होणार नाही,ज्यांना दिसत त्यांनी करावं,समाज आपला आहे.त्यांचे उत्तर मला अंत्यात्रेच्या समयी सापडले.एक सामाजिक कार्यकर्त्या उल्का ताई यांचे दुःख किती अनावर झाले ते मी पाहिले.समाजाची यात्रा जणू या खाडी किनारी भरली होती.आत्ता नाही येणे जाणे,आपण एकदाची भेटू परलोकी असा संदेश देऊन समाजाला न्याय देणारा परम स्नेही लवकर हरपला.

भावपूर्ण श्रद्धांजली दिलीप पाटील यांना.

# प्रशिक अधिकारी कर्मचारी संस्थेमार्फत आरोग्य शिबिराचे आयोजन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**

प्रशिक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था (रजि.) महाराष्ट्र राज्य व नवयुग सिध्दार्थ क्रीडा मंडळ, अशोकनगर, वालधुनी, कल्याण (पूर्व) यांच्या सहकार्याने नुकतेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह, अशोक नगर वालधुनी कल्याण येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात जवळपास १२५ ते १४० व्यक्तींनी सहभाग नोंदवून आपली आरोग्य तपासणी करून घेतली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, डोळे तपासणी, त्वचारोग व सर्वसाधारण आजार असलेल्या व्यक्तींची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात अपोलो हॉस्पिटलचे आरोग्य पथकातील श्री.मनोज गुप्ता यांच्यासह डॉ.रेखा गायकवाड, डॉ.शतानवानजी हे कार्यरत होते. जायंट ग्रुप - जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशन, डोंबिवली युनिट १ चे डॉ.विकास जोशी व त्यांचे आरोग्य पथक यांनीही सहभाग नोंदविला.

त्याचप्रमाणे भैरव सेवा समिती, भिवंडी यांचे पथकही सामील होते. तसेच डॉ.अशोक लोंढे व डॉ.शशिकांत ननावरे यांच्या पथकाने सहभाग नोंदवून लाभार्थ्यांची सर्वसाधारण तपासणी केली तर डॉ.ननावरे आणि डॉ.रवींद्र जाधव व त्यांच्या डॉ.सुरेखा जाधव यांनी रुग्णांची तपासणी करून औषधांचे वाटपही केले. या शिबिरात सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी विनामूल्य आपला वेळ व सेवा प्रदान केली.

तत्पूर्वी दि.२४ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेच्या उद्द्देशिकेचे वाचन संस्थेचे अध्यक्ष आयु. यशवंतराव गायकवाड यांनी केले. त्यास उपस्थित सर्व जनसमुदयाने एका स्वरात प्रतिसाद दिला. छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, नवी मुंबई, पनवेल येथील संविधान अभ्यासक आयु, प्रा.बाबूराव बनसोडे यांनी उपस्थित जनसमुदयास भारतीय राज्यघटनेचे महत्त्व पटवून दिले. प्रशिक संस्थेचे पदाधिकारी कार्याध्यक्ष बी. डी. जाधव, उपाध्यक्ष यशवंतराव भालेराव, अशोक दुधसागरे, कोषाध्यक्ष शांताराम गायकवाड, सहसचिव विजय थुले, पी.डी निकुंभ, सुधाकर जाधव, ज्येष्ठ सदस्य एस. डी. मोरे, ॲड.लभाणे आणि सदस्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकम यशस्वी झाला, असे प्रशिक अधिकारी-कर्मचारी संस्थेचे सचिव रंगनाथ गरुड यांनी कळविले आहे.

# उल्हासनगर डंपिंगवर आग विझवतांना जवान भाजला

## डंपिंग ग्राउंड चा प्रश्न आता जवानांच्या जिवावर बेततोय...

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता उल्हासनगर(प्रतिनिधी) :**

उल्हासनगर महापालिका हद्दीतील डंपिंग ची समस्या वर्षानुवर्षे धगधगतेच आहे. याबाबत शहरातील अनेक राजकीय सामाजिक संस्थानी वारोंवार मोर्चे आंदोलने करूनही प्रशासन हा प्रश्न समुळ नष्ट करण्यात अयशस्वी ठरलंय. पालिकेचा हा असंवेदनशील पणा आता मात्र आग नियंत्रक जवानांच्या जिवावर बेतु लागलाय.

शहरातील डम्पिंगच्या समस्येने स्थानिक नागरिकांचं आरोग्य धोक्यात घातलेलं आहेच, परंतु या डम्पिंग वर लागणाऱ्या आगीमुळे आता कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या अग्निशमन जवानांचं जीवित सुद्धा धोक्यात आलं आहे. बंडु गुजर असं भाजलेल्या जवानाचं नाव आहे. दुपारी साडेतीनच्या दरम्यान डम्पिंग डोंगराच्या टोकावर





आग विझवतांना बंडु यांचे अचानक धगधगत्या दलदलीत दोन्ही गम बुटांसह पाय फसले. हिच उष्ण राख गमबुटात जाऊन गुडघ्याच्या खाली दोन्ही पाय भाजले. त्यांच्या सहकाऱ्यांनी त्वरित बंडू यांना खेचून काढल्याने थोडक्यावर निभावले.उल्हासनगरात डम्पिंग ग्राउंड ची गंभीर समस्या आहे. वर्तमान जागेची कचरा साठवणुकीची क्षमता संपुष्टात आलेली आहे. त्यातच ओला आणि सुका कचरा असं वर्गीकरण उल्हासनगर महानगरपालिका करीत नसल्यामुळे कचऱ्याची दुर्गंधी, डम्पिंग ग्राउंड वर वारंवार लागणारी आग व त्यातून निर्माण होणाऱ्या धुरामुळे नागरिकांमध्ये पसरणारं अनारोग्य यावर अनेक आंदोलनं झाली, परंतु पर्यायी व्यवस्था करीत आहोत या सबबीवर महानगरपालिका गेली दहा वर्षं वेळ मारून घेत आहे.आता काल-परवा लागलेल्या या आगीत अग्निशमन जवान आग विझवताना भाजला गेल्याची दुर्घटना घडल्यानंतर डम्पिंग ग्राउंड चा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दुर्घटनाग्रस्त जवान कंत्राटी पद्धतीने काम करीत असल्याने उपचारांचा संपूर्ण खर्च कोण उचलणार, आजारपणातल्या सुट्टीचा पगार भरून मिळेल काय, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या कंत्राटी अग्निशमन जवानांना गेली सहा वर्षे नवीन गंपूट आणि गणवेश दिला गेलेला नाही. नवीन दिले ते देखील जवानांच्या मानाने कमी जोड दिलेले आहेत. त्यामुळे या कंत्राटी जवानांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासन आणि कंत्राटदार गंभीर असल्याचे दिसत नाही.परंतु, उद्या एखाद्याचं बरंवाईट झालं तर मागे कुटुंबाला भवितव्य काय, हा कंत्राटी पद्धतीतला महत्त्वाचा मुद्दा पुन्हा समोर आला आहे. राज्य सरकारने याबाबतीत ठोस धोरण ठरवलं पाहिजे, अशी मागणी लेबर राईट्स चे संस्थापक राज असरोंडकर यांनी केली आहे.

# संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :**

राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गुरव समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळांची स्थापना केली आहे. गुरव समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरीता रु.१.०० लक्ष थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणा-या लाभार्थीना व्याज नाही) व २०इ बीज भांडवल योजना, तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १०.०० लक्ष पर्यंत), गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१०.०० लक्ष ते रु.५०.०० लक्ष पर्यंत) या योजनांचा समावेश आहे. या योजनांचा लाभ गुरव समाजातील युवकांनी घेऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक (अ.का.) निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे.थेट कर्ज योजना व २०% बीज भांडवल योजना या योजनांचे अर्ज ठाणे जिल्हा कार्यालयात सशुल्क उपलब्ध आहेत.




११ डिसेंबर २०२४
बुधवार

**मेष**

आज तुमच्या व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**

कौटुंबिक बाबींमध्ये थोडी घाई करावी लागेल. आजच्या कार्यात तुमच्या योगदानामुळे तुमचा आदर आणि सन्मान देखील वाढेल.

**मिथुन**

कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे. कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क**

घरात महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल. व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**सिंह**

तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील.अज्ञात व्यक्तीशी जास्त संवाद साधल्याने तुमचे नुकसान होऊ शकते.

**कन्या**

ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्यांमुळ आळस हावी राहील.

**तूळ**

प्रलंबित देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे. तुमची सर्व मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल.

**वृश्चिक**

कोणतीही खास गोष्ट कोणाशीही शेअर करू नका. ति स्वकेंद्रित असण्याने आणि अहंकाराची भावना असल्यामुळे परस्पर संबंधांमध्ये काही तणाव निर्माण होतो.

**धनु**

विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांचे पूर्ण सहकार्य मिळेल. आज तुम्ही तुमची लपलेली प्रतिभा ओळखून सर्जनशील कार्यात त्याचा वापर कराल.

**मकर**

आज तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की एखाद्या व्यावसायिकाशी भांडण सारखे प्रसंग उद्भवू शकतात. रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

**कुंभ**

तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल आणि तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल.

**मीन**

कोणतेही काम करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित माहिती घेतल्यास अधिक यश मिळेल. तुम्ही तुमची प्रतिभा ओळखाल कामाचा क्रम पूर्ण उर्जेने सांभाळाल.

# साकीनाका येथे निरंकारी भक्तांचे रक्तदान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**
निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या 'नर सेवा नारायण पूजा' या शिकवणूकीचे अनुसरण करत संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रविवारी साकीनाका येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १४५ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे भाग घेतला. संत निरंकारी रकतपेढीने या शिबिरामध्ये रक्त संकलन केले. मिशनच्या घाटकोपर व सागबाग शाखांमधील भक्तगणांनी या शिबिरामध्ये रक्तदान करण्यासाठी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांची आध्यात्मिक शिकवण कृतीत उतरवत निरंकारी मिशनकडून देशभर रक्तदानासह मोफत नेत्र चिकित्सा शिबिरे, मोफत आरोग्य चिकित्सा शिबिरे, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण यांसारखे अनेकविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.

रक्तदानाच्या क्षेत्रात मिशनकडून १९८६ पासून आतापर्यंत जवळपास १४ लाख युनिट रक्त संकलित केले गेले आहे जो स्वयमेव एक उच्चांक आहे. नवनिर्वाचित आमदार दिलीप लांडे यांनी या शिबिराला सदिच्छा भेट दिली आणि रक्तदात्यांचा उत्साह वाढविण्याबरोबरच संत निरंकारी मिशनच्या वतीने निष्काम भावनेने केल्या जाणाऱ्या मानवसेवेच्या कार्याचे कौतुक केले. मिशनच्या घाटकोपर सेक्टरचे संयोजक प्रकाश जोशी तसेच सागबाग शाखेचे मुखी महेंद्र सामल यांच्या देखरेखीखाली स्थानीय सेवादल युनिट व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांच्या सहकार्याने या शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

# 'असा मी असामी' एकपात्री कार्यक्रम उत्साहात संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
सार्वजनिक वाचनालय कल्याण, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु. भा. भावे व्याख्यान मालेअंतर्गत पु.ल.देशपांडे लिखित 'असा मी असामी'' या पुस्तकावर आधारित एकपात्री विनोदी कार्यक्रमाचे सादरीकरण झाले.
'असा मी असामी' या पुस्तकातील अनेक गमतीदार प्रसंग, किस्से,लग्नसोहळयाच्या पारंपरिक पद्धती,उखाणे अशा अनेक भागांचे सादरीकरण मराठी मलिका अभिनेता सुबोध चितळे यांनी केले. त्यांनी 'व्यक्ती आणि वल्ली' या पुलंच्या पुस्तकातील रत्नागिरीचा अंतुबर्वा ते अंतुशेठ या व्यक्तीमत्वाचा जीवनप्रवास,दामूकाका व कोचरेकर मास्तर इ.व्यक्तिरेखांचे व्यक्तीचित्रण अभिनयातून प्रेक्षकांच्या मनापर्यंत पोहचली.तसेच कोकणातील माणसं तिथल्या फणसासारखीच असतात.पिकल्याशिवाय त्यांच्यातील गोडवा जाणवत नाही अशा पु.लंच्या साहित्यातील विविध भावनेने ओतप्रोत असलेले भावबंध जिवंत साकार केले. प्रसंगी वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर, खजिनदार दिलीप कर्डेकर,कार्यकारिणी सदस्य अरविंद शिंपी,अमिता कुकडे,ग्रंथसेविका, वाचकवर्ग तसेच पु.लंचा तमाम चाहतावर्ग उपस्थित होता.वाचनालयाच्या सभागृहात हास्यकल्लोळात कार्यक्रमाचे सादरीकरण झाले.

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार



ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. बरोबर १०२ वर्षांपूर्वी म्हणजे ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली.

दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगल बंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही.
अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे/९९२२५४६२९५**

# केडीएमसी क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विशेष स्वच्छता मोहिमेचे नियोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एअर क्वालीटी इंडेक्स सुधारण्यासाठी, रस्ते संपूर्ण स्वच्छता करुन धुळमुक्त करणे, या हेतुने महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ५ डिसेंबर पासून महापालिका क्षेत्रातील सर्व मुख्य रस्ते रात्रपाळीत स्वच्छ करण्यात येत आहेत.
याकारिता विभागामार्फत नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात आला असून, त्यानुसार २३ रस्ते पॉवरस्वीपर मशीन द्वारे व ५७ रस्ते हे मनुष्यबळाद्वारे रात्रपाळीत सहा.आयुक्त प्रिती गाडे, मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलुरकर, परिमंडळ -१(कल्याण) चे उप मुख्य स्वच्छता अधिकारी मोहनीश गडे तसेच परिमंडळ-२ (डोंबिवली) चे उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र खैरे यांच्या नियंत्रणाखाली स्वच्छ करण्यात येत आहे.प्रभागक्षेत्र स्तरावर सुरु असलेल्या रात्रपाळीत कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी



अ प्रभाग क्षेत्रातील मोहने गेट, ब प्रभाग क्षेत्रातील प्रेम ऑटो ते व्हरटेक्स व खडकपाडा ते झुलेलाल चौक, ग प्रभाग क्षेत्रातील इंदिरा गांधी चौक ते गावदेवी मंदिर परिसर, मलंगरोड या ठिकाणी महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील, सहा.आयुक्त प्रिती गाडे यांच्या मार्फत दि. ६ व ७ डिसेंबर या दिवशी रस्ते सफाई दरम्यान भेट देवून प्रत्यक्ष कामाची पाहणी करण्यात आलेली असून, कार्यवाही दरम्यान येणाऱ्या अडचणींबाबत संबंधीत स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व इतर कर्मचारी यांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच कामाची गुणवत्ता वाढविणेबाबत सुचना देण्यात आल्या.
हि कार्यवाही ४ पॉवर स्वीपर वाहने व २०० मनुष्यबळाच्या सहाय्याने करण्यात येत असून, प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणेकामी संबंधीत परिसरातील स्वच्छता निरीक्षक यांचेवर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. सदर कार्यवाही दरम्यान आतापर्यंत जवळपास १५ टन धूळ व माती तर रस्त्यावरील जवळपास १५० टन कचरा उचलण्यात आलेला आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या धूळ क्षमन वाहनांमार्फत देखील नियोजन बध्द कार्यवाही करण्यात येत असून, यामुळे महापालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीमुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एअर क्वालीटी इंडेक्स मध्ये सुधारणा होण्यास मदत झाली आहे. पुढील कालावधीमध्ये देखील ही कार्यवाही सुरु राहणार असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिली आहे.

# राजकारणातून समाजहित जपणारा नेता गमावला

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**
ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सोमनहल्ली मैल्लया कृष्णा तथा एस.एम.कृष्णा यांच्या निधनाने, आपल्या राजकारणातून समाजहित जपणारा आणि देशाच्या सेवेसाठी समर्पित भावनेने कार्यरत असलेले नेतृत्व आपण गमावले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली.
मुख्यमंत्री श्री. फडणवीस आपल्या संदेशात म्हणतात, श्री. एस. एम. कृष्णा यांनी लोकहिताच्या कामासाठी पदे असतात हे ओळखून त्यांनी लोकांचे जीवन उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून काम करताना त्यांनी राज्याला मार्गदर्शन करण्याचे काम केले.

विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा अशा सर्व सभागृहात काम करताना त्यांनी, विधानसभा अध्यक्ष, मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यपाल अशी सर्व पदे भूषविली. विद्यापीठ सुधारणा हे त्यांचे आवडीचे क्षेत्र होते. विशेषतः बंगळुरूचे माहिती आणि तंत्रज्ञान शहरात रूपांतर करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन २०२३ मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचे हे कार्य कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. हे दुःख सहन करण्याची ताकद त्यांच्या कुटुंबियांना लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना !

# रिक्षा चालकांच्या प्रश्नांसाठी आरटीओला दिला उपोषणाचा इशारा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
रिक्षा चालकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी रिक्षा चालकांनी आरटीओला उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कल्याण आशुतोष बारकुल यांना त्यांच्या दालनात समक्ष भेटून रिक्षा टॅक्सी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष महेंद्र मिश्रा यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले.

त्या निवेदना मध्ये रिक्षा टॅक्सी चालकांना बॅच लायसन, रिक्षाला व्याजासह पूर्ण रक्कम रिक्षा चालक भरतोय, केंद्रीय मोटर वाहन अधिनियम (१९३९ चा ४) १९८८ सुधारित १९८९ नुसार सर्व नियम एवढेच नव्हे तर आम्ही प्रवासी वर्गाकडून प्रवासी भाडे किती रुपये घ्यावे हा दिवसभर रिक्षा चालवण्याच्या अंदाजावर त्यांचा रिक्षाचा घसारा रिक्षाला येणारा खर्च, रिक्षा १५ वर्षांनी स्क्रॅप करायची त्यांची किंमत त्याप्रमाणे असे अनेक मुद्दे कमिटीने लक्षात घेऊन २३ रुपये ठरवून दिलेला आहे.

जर रिक्षा चालकांना २ रुपये वाढवायचे असेल तर शासन सांगेल तेव्हा घेता येतात. पण तेच बाटल्या टेस्टिंग वाले आमच्या माहितीनुसार मोटर वाहन अधिनियम १९८८ कलम ५६ (२) पोट कलम १ नुसार परिवहन विभागाकडून परवाना घेतलेला आहे ते दोन महिने अगोदर पर्यंत ६०० रुपये घेत होते. अचानकपणे त्यांच्या सामुग्रीत असे काय वाढ झालेली आहे, किंवा अशी किती महागाई वाढलेली आहे. त्यामुळे आज तेच बाटल्या टेस्टिंग चालक २८०० रुपये घेत आहेत आपण त्यांना आपल्या विभागाकडून योग्य ती समज देऊन पुन्हा ६०० रुपये घेण्यास सांगावे अन्यथा कृती समितीच्या माध्यमाने वार बुधवार दिनांक १ जानेवारी २०२५ पासून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कल्याण यांच्या कार्यालया बाहेर बाटला टेस्टिंग शुल्क ६०० रुपये होत नाही तोपर्यंत उपोषण करण्यात येईल.

यावेळी कृती समितीचे न्यू संघर्ष ऑटो रिक्षा युनियनचे ठाणे जिल्हाध्यक्ष महेंद्र मिश्रा, भाजपा वाहतूक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विल्सन काळपुंड, रिपब्लिकन रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटनेचे कल्याण शहराध्यक्ष मोहन पाठारे, रयत वाहतूक संघटनेचे अध्यक्ष राहुल वारे, आदर्श राष्ट्रवादी रिक्षा युनियनचे कल्याण शहराध्यक्ष ज्ञानेश्वर सोनवणे, आरपीआय वाहतूक आघाडी (A) ठाणे जिल्हाध्यक्ष अरविंद अंगारखे, न्यू एकता रिक्षा संघटनाचे कल्याण शहराध्यक्ष सदाशिव सोनवणे हे उपस्थित होते.

# एस एम कृष्णा यांच्या निधनामुळे राजकारणातील सुसंस्कृत, अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्व गमावले

**- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**
महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी दुःख व्यक्त केले आहे.
एस एम कृष्णा हे कर्नाटक व देशाच्या राजकारणातील एक सुसंस्कृत व्यक्तिमत्व होते. उच्च विद्याविभूषित असलेले एस एम कृष्णा एक अनुभवी संसदपटू होते. बॅरिस्टर नाथ पै यांच्या प्रजा समाजवादी पक्षातर्फे ते पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले होते. आपल्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत त्यांनी कर्नाटक विधानसभेचे अध्यक्ष, कर्नाटकचे मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल व केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून उल्लेखनीय काम केले.
साहित्य, टेनिस व शास्त्रीय संगीताची आवड असणाऱ्या एस. एम. कृष्णा यांनी राजभवन येथे शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यांनी आपल्या कार्यकाळात राज्यपाल पदाची गरिमा जपली. त्यांच्या निधनामुळे राजकारणातील एक सुसंकृत व अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्व गमावले आहे.
या दुःखद प्रसंगी एस. एम. कृष्णा यांना श्रद्धांजली अर्पण करतो व आपल्या शोकसंवेदना त्यांच्या कुटुंबियांना कळवतो, असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# मुथा महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
शेठ हिराचंद मुथा महाविद्यालय कल्याण तसेच मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुंबई विद्यापीठ अंतर महाविद्यालय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पुरुष आणि महिला गटात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजप कल्याण जिल्हा अध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.
कुस्तीचा खेळ हा फक्त शक्तीचा नसून तो बुद्धीचाही आहे. आपल्या सगळयांचे भाग्य आहे की ८०० महाविद्यालय असणाऱ्या या मुंबई विभागाच्या कुस्तीच्या स्पर्धा भरविण्याचा मान कल्याणच्या मुथा महाविद्याल याला मिळाला. सध्याच्या काळात ऑलिंपिक स्पर्धेत भारताला अनेक पदके मिळवून दिली. अश्या प्रकारच्या स्पर्धा पुढच्या यशासाठी उपयोगी ठरतात अशा भावना व्यक्त करून सूर्यवंशी यांनी यावेळी स्पर्धकांना स्पर्धेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.
यावेळी महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रकाश मुथा, ट्रस्टी मनीष मुथा, अन्वेशा मुथा, महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुजा ब्रह्म, सीबीएससी स्कूल प्राचार्या सपना गदिया, अग्रवाल कॉलेजचे ट्रस्टी ओमप्रकाश पांडे, माजी नगरसेवक जयवंत भोईर, मुंबई विद्यापीठाचे डायरेक्टर ऑफ स्पोर्ट्स अँड फिजिकल एज्युकेशनचे डॉ. मनोज रेड्डी, स्पोर्ट्स विभागाचे सदस्य डॉ. चंद्रकांत म्हात्रे, ठाणे झोन सेक्रेटरी राहुल अकुल, मुंबई विद्यापीठ स्पोर्ट्स कमिटी मेंबर डॉ. शिल्पा शेरेगल, मुंबई विद्यापीठ स्पोर्ट्स कमिटी मेंबर डॉ. रवींद्र गायकर, प्रमोद बोराडे या प्रसंगी उपस्थित होते.

स्पर्धेचा प्रारंभ एकाच वेळी दोन वजनी गटात पार पडला. डीएसपी कॉलेज तसेच रिझवी कॉलेज यांच्या १२५ किलो वजनी गटात पार पडली. तसेच रामशेठ ठाकूर कॉलेज कांदिवली व भवन्स कॉलेज यांच्या ८६ किलो वजनी गटात पार पडली. त्यामध्ये विजय स्पर्धकांचे नावे १२५ किलो वजनी गटात सोहम मात्रे तसेच ८६ किलो वजनी गटात सिद्धेश खडकर विजेते ठरले. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये एकूण दीडशे महाविद्यालय सहभागी झाले आहे.

# शुक्रवारपासून कल्याणमध्ये रंगणार देवगंधर्व महोत्सव

## केडीएमसी आणि कल्याण गायन समाज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली महानगर पालिका आणि कल्याण गायन समाज, कल्याण (प.) यांच्या संयुक्त विद्यमाने 'देवगंधर्व महोत्सवाचे' आयोजन दि.१३, १४ व १५ डिसेंबर रोजी पश्चिमेतील प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिर येथे करण्यात आले आहे.
विख्यात शास्त्रीय संगीत गायक आणि वादकांच्या सादरीकरणामुळे देशातील एक महत्वाचा संगीत महोत्सव अशी ओळख असणाऱ्या येथील 'कल्याण गायन समाज प्रस्तुत देवगंधर्व महोत्सवात' यंदाही लौकिकाला साजेशा संगीत मैफली होणार आहे. या महोत्सवात कौशिकी चक्रवर्ती, निलाद्रीकुमार, निषाद बाक्रे, मानसकुमार, मंजिरी असनारे-केळकर आदी कलावंत त्यांची कला सादर करणार आहेत. देवगंधर्व महोत्सवाचे हे २३वे वर्ष असून, संपूर्ण महोत्सवाचे सूत्र संचालन श्रीराम केळकर करणार आहेत.
महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार, दि. १३ डिसेंबरला रात्री ८.४५ वाजता




होणार असून, पहिल्या सत्रात मंजिरी असनारे केळकर यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यांना विश्वनाथ शिरोडकर (तबला) आणि सीमा शिरोडकर (हार्मोनियम) साथ करतील. दुसऱ्या सत्रात मानसकुमार यांचे व्हायोलिन वादन होईल. त्यांना ओजस अधिया तबला साथ करणार आहेत.
शनिवारी १४ डिसेंबर रोजी सुप्रसिध्द गायिका कौशिकी चक्रवर्ती यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यांना ओजस अधिया (तबला), अजय जोगळेकर (हार्मोनियम) आणि मुराद अली (सारंगी) साथ करतील. त्याचप्रमाणे रविवारी १५ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता दिनकर संगीत विद्यालय आणि म्हैसकर कला अध्यासनाच्या विद्यमाने 'आवर्तन' ही वाद्यसंगीताची मैफल सादर होईल. संकल्पना स्वप्नील भाटे यांची आहे. या मैफलीत स्वप्नील भाटे (तबला), सुधांशू घारपुरे (हार्मोनियम), कौस्तुभ दिवेकर (ड्रम), प्रथमेश तारळकर (पखवाज), क्षमा कुलकर्णी (कथक), ईशान भट (पढत) आणि कौस्तुभ आपटे (गायन) सहभागी होणार आहेत. तसेच संध्याकाळी ५.३० वाजता निषाद बाक्रे यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यांना विश्वनाथ शिरोडकर (तबला), अनंत जोशी (हार्मोनियम) साथ करतील. त्यानंतर 'एक शाम निलाद्री के नाम' या मैफलीत सुप्रसिध्द सितारवादक निलाद्रीकुमार यांचे सादरीकरण होईल. त्यांना सत्यजीत तळवलकर (तबला), अँग्नोलो फर्नांडिस (गिटार) आणि शिखरनाद कुरेशी (जेम्बे) साथ करतील.

# आमटेम शाळेतील विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाचे मार्गदर्शन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)** पेण तालुक्यातील रा.जि.प.प्राथमिक शाळा आमटेम येथे व्यक्तिमत्व विकास व संवाद कौशल्य या अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व ओवरहेड प्रोजेक्टर याचा वापर करून व प्रत्यक्ष मार्गदर्शन सामाजिक कार्यकर्ते विनिता तांडेल केले.या पुढेही अनेक उपक्रम राबवायचे असून त्यामध्ये खगोल शास्त्रीय ज्ञान, गणितीय ज्ञान आणि विशेष म्हणजे गरीब गरजू आणि होतकरू ज्यांच्यात शिकण्याची आवड आहे परंतु परिस्थिती आड येत अशा मुलांना मदतीची हात देऊन पुढे न्यावे असे उद्दिष्ट आहे. आजच्या व्यक्तिमत्व विकास या शिबिरात अनेक मुद्द्यांवर हात घातला त्यामध्ये आपला आत्मविश्वास,, संवाद कौशल्य, मायक्रो प्लॅनिंग,, सहानुभूती, वेळेचे नियोजन, आपली दिनचर्या,, इतरांबद्दल आदर अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा करून एक यशस्वीपणे शिबिर संपन्न झाला.आमटेम शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करून सहकार्य केले.

# एकलव्य कष्टकरी संघटना व संघटनेचा मित्र परिवार वतीने अभिवादन सभेचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**

आदिवासी एकता परिषदेचे राष्ट्रीय नेते व भुमीसेना या लढाऊ आदिवासी संघटनेचे संस्थापक काळुराम काका धोदडे यांची एकलव्य कष्टकरी संघटना व संघटनेचा मित्र परिवार यांच्या वतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.



येथील माहुली जवळील सुतार पाडा येथे पार पडलेल्या या अभिवादन सभेत जवळपास २०० आदिवासी स्त्री पुरुषांनी सहभाग घेतला होता. या सभेवेळी आदिवासी एकता परिषदेचे राष्ट्रीय कार्यकारिणीचे नेते वहारुभाऊ सोनवणे, परीषदेचे राज्य स्तरीय नेतृत्व राजूभाऊ पांढरा, काळुराम काका धोदडे यांची कन्या ॲड. मिनाताई धोदडे, दत्ताभाऊ करवट तर सभेच्या अध्यक्षपदी श्रमिक मुक्ती दलाचे नेते व राज्य स्तरीय पाणी संघर्ष चळवळीचे नेते भारत पाटणकर, पॅंथर सुमेध जाधव, ॲड.स्वप्निल ढसाळ, ॲड.संगिता ढसाळ, रवी भिलाने, समता संघर्ष चळवळीचे ॲड.शैलेश दोंदे, कामगार एकता युनियनचे राजूभाऊ वंजारे व महाराष्ट्र राज्य घरेलु कामगार युनियन अध्यक्षा श्रीमती कमल साळुंखे, राष्ट्रीय घरकामगार चळवळीचे ज्ञानेश पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. या सभेत प्रामुख्याने आदिवासी मुक्ती आंदोलनात काकाने जो जीवनदानी सहभाग दिला व आदिवासी समाजाला जे सांस्कृतिक संघर्षाचे भान दिले त्यावर वक्त्यांनी भाष्य करून काकाने आदिवासी समाजाला दिलेल्या आत्मभान दिशेला पुढे नेण्याचे आश्वासन उपस्थित समुदायाला दिले.

सभा यशस्वी करण्यासाठी एकलव्य कष्टकरी संघटनेचे गोपाळ बरफ, बाळुदा दरोडा, विष्णू टोकरे, अंकुश टोकरे, रघुनाथ बोंद्रे, बुधाजी दरोडा आदी पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

### मालमत्ता विभाग

**निविदा सुचना क्र. ०५ सन २०२४- २०२५ ( दुसरी मागणी)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वयेच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या समावेशक आरक्षणांतर्गत 'वाचनालय' या मालमत्ता १० वर्षे कालावधीसाठी व्यवस्थापन करार तत्वावर सामाजिक संस्थांना चालविण्यास देणेबाबत.

१) निविदा विक्री दि.१२/१२/२०२४ ते दि.२६/१२/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

२) निविदा स्विकृती दि.१२/१२/२०२४ ते दि.२६/१२/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

३) निविदा पूर्व बैठक दि.१७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. उप आयुक्त (मालमत्ता) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.

४) शक्य झाल्यास दि. २७/१२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ई टेंडरींग विभाग नागरीक सुविधा केंद्र, येथे उघडण्यात येईल.

५) निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

आलेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त,कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवला आहे.

**सही / -**
**उप आयुक्त (मालमत्ता)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**जा.क्र/ कडोंमपा/जसंवि/मुका/१९१८**
**दिनांक - १०/१२/२०२४**

# दुर्गाडीचा निकाल म्हणजे हिंदूंचा विजय - शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण (प्रतिनिधी) :**

दुर्गाडी किल्ल्याबाबत न्यायालयाचा निकाल आल्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांसाह शिवसेनेने किल्ल्यावर जाऊन दुर्गा देवीच्या मंदिरात आरती करत जल्लोष केला. शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी, हा निकाल म्हणजे हिंदूचा विजय आहे. हा दावा काही धर्मीयांनी टाकला आहे. न्यायालयाने हिंदू धर्माला न्याय दिला आहे. सत्याचा विजय झाला असल्याचे रवी पाटील यांनी सांगितले.



श्री किल्ले दुर्गाडी देवस्थान हे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले पवित्र स्थान आहे. या देवस्थानात हिंदूंना प्रवेश बंदी होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व मीनाताई ठाकरे यांनी बंदी हुकूम मोडून श्री दुर्गादेवीची महापूजा केली. व समस्त दुर्गाभक्तांना दुर्गादेवीचे मंदिर दर्शनासाठी खुले करून दिले. तेव्हा पासून श्री दुर्गादेवीचा किल्ले दुर्गाडी नवरात्रोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जातो.

कल्याणच्या ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यासंदर्भातील दाव्याचा निकाल तब्बल ४८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर हिंदूंच्या बाजूने लागला. दुर्गाडी किल्ला ही वक्फ बोर्डाची जागा असल्याचा मजलीस संघटनेचा दावा आज न्यायालयाने फेटाळला असल्याचे रवी पाटील यांनी सांगितले. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे, माँसाहेब स्व. मीनाताई ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्यानंतर त्यांचा वारसा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू ठेवला.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे त्याचबरोबर कल्याण शहरातील कै.दिलिप कपोते, चंद्रकांत भोईर, दिपक सोनाळकर, अशोक मांडले, रवीकांत वायले, राजेंद्र देवळेकर, दशरथ घाडीगावकर, शर्यु प्रधान अनेक ज्येष्ठ शिवसैनिक बाळ हरदास, काका हरदास, भाई दिक्षित, रविंद्र कपोते, विजय साळवी, अरविंद मोरे, विश्वनाथ भोईर, वैजयंती घोलप, विजया पोटे, छाया वाघमारे, सचिन बासरे, समीर देशमुख, किशोर शुक्ला, दिनेश देशमुख, पराग तेली, सुरेंद्र भेलेकर, अमोल जव्हेरी, अनिल तिवारी, राजन चौधरी, बंडू घाणेकर, सुहास शाहीवाली तसेच न्यायालयात हिंदुच्या बाजूने मांडणारे ॲड सुरेश पटवर्धन, ॲड भिकाजी साळवी, सरकारी वकील ॲड. सचिन कुलकर्णी यांचे व अनेक शिवसैनिकांच्या व सहकार्यांच्या अथक प्रयत्नांना लाभलेले हे यश असल्याचे रवी पाटील यांनी सांगितले. शिवसेना, हिंदू संघटना,सरकारी वकील,हिंदू मंचाच्या वतीने १९७६ पासून सातत्याने करण्यात आलेल्या अथक संघर्षाचे हे फळ आहे. या आंदोलनात सहभागी झालेल्या प्रत्येक हिंदू मनाला आज आनंद झाला आहे. यानिमित्त किल्ले दुर्गाडी देवस्थानचा अध्यक्ष या नातयाने शिवसेना कल्याण शहर शाखेच्या वतीने किल्ले दुर्गाडीवर जाऊन न्यायालयाने दिलेल्या निकालाचे स्वागत करून आई दुर्गादेवीची आरती केली व आशीर्वाद घेतले असल्याची माहिती रवी पाटील यांनी दिली.

# दुर्गाडीच्या निर्णयाची शासनाने योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी - माजी मंत्री रवींद्र चव्हाण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण (प्रतिनिधी) :**

दुर्गाडी किल्ल्याच्या निर्णयाची शासनाने योग्य प्रकारे अंमल बजावणी करावी अशी प्रतिक्रिया माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली आहे. रवींद्र चव्हाण यांनी आज डोंबिवली जिमखाना येथे पत्रकार परिषद घेत दुर्गाडी किल्ला निकालाबाबत आनंद व्यक्त केला. तसेच या निकालासाठी हिंदूंनी सुमारे ४-५ दशकांपासून केलेल्या अथक प्रयत्नांचा आढावा मांडला. याप्रसंगी हिंदू मंचाचे दिनेश देशमुख, विश्व हिंदू परिषदेचे पराग तेली, सुरेंद्र भालेकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलतांना रवींद्र चव्हाण यांनी दुर्गाडी किल्ल्याबाबत न्यायालयाने निर्णय दिल्याबद्दल न्यायालयाचे आभार मानले.



या निर्णयाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात यावी अशी शासनाला विनंती केली. यासाठी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, स्व. आनंद दिघे, हिंदू संघटनांनी मेहनत घेतली. मलंग गडाचा विषय देखील अनेक वर्षे प्रलंबित आहे त्या विषयात लक्ष घालून मार्गस्थ करणे देखील गरजेचे आहे. ४८ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर हा निर्णय झाला हे निर्णय त्या त्या वेळी झाले असते तर हा प्रश्न लवकर मार्गी लागला असता असे चव्हाण यांनी सांगितले.तर याबाबत हिंदू संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी १९७१ साली ठाणे जिल्हा अधिकाऱ्यांच्या कार्यालयाने ही वास्तू मंदिर म्हणून जाहीर केलेली होती. या वास्तूमध्ये मंदिर आहे मसजीदला कुठली खिडकी नसते. मूर्तीला उभे राहण्यासाठी जागा देखील आहे. देवालय पाहून देवालयाच्या दृष्टीने ही मंदिराची जागा आहे हे शासनाने स्पष्ट केलं होतं. मात्र मुस्लिम समाजाने १९७६ ला मसजीद असल्याचा दावा केला त्यानंतर ठाण्यातून कल्याण न्यायालयात या प्रकारचा दावा वर्ग करण्यात आला होता. त्यावर न्यायालयाने शासनाने दिलेला निर्णय योग्य असल्याचे सांगतले आहेः त्यामुळे न्यायालयाचे आम्ही आभार मानत असल्याचे हिंदू मंचचे अध्यक्ष दिनेश देशमुख यांनी सांगितले.

# कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कु.सु.म) विशेष मोहिम २०२४- २०२५

दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :

दि.१६/१२/२०२४ ते २०/१२/२०२४ दरम्यान कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कु.सु.म) विशेस मोहिम २०२४-२०२५ भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका क्षेत्रात कुष्ठरोग निर्मूलन मोहिम राबवण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये विटभटी कामगार, सुतगिरणी कामगार, बांधकाम कामगार व बालसुधार ग्रह मुलांची ईत्यादी, प्रत्येक कामगारांची कुष्ठ रोगा बदल वैद्यकिय तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी सर्व नागरीकांनी सहकार्य करावे असे आवाहन सहाय्यक संचालक, (कुष्ठरोग) आरोग्य विभागाच्या डॉ. श्रीमती गिता काकडे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर, क्षयरोग व कुष्ठरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद महानगरपालिका प्रशासन यांच्या कडून करण्यात येत आहे.

कुष्ठरोगा बदल समाजामध्ये असलेले गैरसमज दूर करण्यासाठी शासन स्थरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. कुष्ठरोग हा जंतुमुळे होणारा आजार आहे. कुष्ठ रोग हा मंदगतीने वाढणारा आजार आहे. याची लक्षणे दिसण्यासाठी कमीत कमी तीन ते दहा वर्षाचा कालावधी जातो. याचे मुख्य लक्षण म्हणजे न वाजणारा न दुखणारा लालसर पांढरा चटटा हे आहे. शरीरावर गाठी येणे, कानाच्या पाळया जाड होणे, चेहरा तेलकट होणे हे लक्षणे प्रामुख्याने आढळतात. बहुविधा औषधोपचाराने कुष्ठरोग बरा करणे शक्य झाले आहे. कुष्ठरोगावर वेळेत उपचार घेतल्यास लवकर व पूर्णपणे बरा होतो. समाजांमध्ये कुष्ठारोगाबदल असलेले गैरसमज दूर करून त्यांना समाजामध्ये चांगली वागणूक देण्याकरीता जनजागृती करणे हा मुळ उददेश आहे.कलंक कुष्ठरोगाचा मिटवु या, सन्मानाने स्वीकार करु या । लक्षात ठेवा । लवकर निदान लवकर उपचार, निरोगी ठेवा परिवार।

# सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनास ठाणे जिल्ह्यात प्रारंभ

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी सर्वांनी सक्रिय योगदान द्यावे - उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील

दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

भारतीय लष्करातील सैनिक हे अहोरात्र आपल्या सीमेवर रक्षण करत असतात. त्यांच्या प्रती कृतज्ञता दाखविण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधीची संकल्पना अंमलात आणली आहे. या निधीच्या माध्यमातून सैनिक/माजी सैनिक, त्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाते. त्यामुळे शासकीय कार्यालय, जबाबदार नागरिकांनी ध्वज दिन निधीसाठी सढळ हाताने मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील यांनी आज येथे केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलनाचा ठाणे जिल्ह्यातील शुभारंभ कार्यक्रम आज ठाणे जिल्हाधिकारी कार्याल यातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडला. त्यावेळी उपजिल्हाधिकारी श्री. पाटील बोलत होते. कॅप्टन वाय. के. राव, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके, नौदलातील लेफ्टनंट अभिषेक कुमार सिंह, ठाणे तहसीलदार किशोर मराठे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर (नि.) प्रांजळ जाधव यांच्यासह विविध कार्यालयांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.उपजिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले की, गेल्या वर्षी ठाणे जिल्ह्यासाठी ध्वजदिन निधी संकलनाचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालये, दानशूर व्यक्ति, संस्थांनी हातभार लावला आहे. या वर्षीही ठाणे जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी मोठ्या प्रमाणावर योगदान द्यावे. या निधीच्या माध्यमातून माजी सैनिक, शहिद सैनिकांच्या वीरपत्नी, वीरमाता-पिता तसेच पाल्यांना आर्थिक मदत दिली जाते. या निधीतून सहाय्यासाठी माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता-पिता तसेच माजी सैनिकांच्या पाल्यांनी अर्ज करावेत.

भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी तसेच युध्दात अपंगत्व आल ेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झाल ेल्या जवानांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा विनीयोग केला जातो. आपल्या सैनिकांचे ऋण अल्पस्वरुपात फेडण्याची संधी जनतेला ध्वजदिनांच्या निमित्ताने प्राप्त होत असते. त्यामुळे नागरिकांनी सढळ हस्ते जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, यांचे नावे धनादेश/धनाकर्ष किंवा QR कोड द्वारे करून ध्वजदिन निधीस सक्रिय हातभार लावावा व सैनिक मनोबल वाढवावे, असे आवाहनही श्री. पाटील यांनी यावेळी केले. माजी सैनिकांच्या कल्याणकारी कार्यक्रमांसाठी संपूर्ण देशात ०७ डिसेंबर हा दिवस ध्वजदिन म्हणून पाळण्यात येतो व त्यानिमित्ताने ०७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर पर्यंत निधी गोळा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ध्वजदिन निधी संकलनास आज प्रारंभ झाला.

राज्य शासनाकडून ठाणे जिल्ह्यास गतवर्षी रु. १कोटी ८४ लाख ८० हजार रुपये एवढे ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट देण्यात आले होते.० त्यापैकी ७५% उद्दिष्ट पूर्ती करण्यात आली आहे. यावर्षी सुध्दा रु. १ कोटी ८४ लाख ८० हजार एवढे ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट जिल्ह्याला देण्यात आलेले आहे.

तसेच यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या ज्या पाल्यांनी इ. १० मध्ये ९०इ पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत, अशा पाल्यांचा सैनिक कल्याण विभागा मार्फत शाल-श्रीफळ, प्रशस्तीपत्र आणि २० हजार रुपयांचा धनादेश देवून विशेष गौरव पुरस्कार देण्यात आला.यावेळी ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कार्य केलेल्या संस्था, व्यक्तिंचा सत्कार करण्यात आला.

तसेच माजी सैनिकांना कल्याणकारी निधीचे वाटप करण्यात आले.मेजर (नि.) श्री. जाधव यांनी प्रास्ताविकात ध्वजदिन निधी संकलनाची पार्श्वभूमी सांगून ठाणे जिल्ह्याने केलेल्या कार्याची माहिती दिली. यावेळी ध्वज दिन निधी संकलनात ठाणे जिल्ह्याने केलेल्या कार्याचा गौरव म्हणून सैनिक कल्याण मंडळाच्या वतीने देण्यात आलेल्या स्मृतीचिन्ह श्री. पाटील यांच्या हस्ते जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर (नि.) जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

# फ्लेमिंगोंच्या आगमनाची प्रतीक्षाच

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता नवी मुंबई(प्रतिनिधी) :**

नवी मुंबई शहराला फ्लेमिंगो सिटी असे संबोधले जाते. येथील डीपीएस तलाव तसेच एनआरआय कॉप्लेक्स पाठीमागील पाणथळ परिसर तसेच नेरुळ सीवूड्स येथील टी एस चाणक्य तलाव येथे मोठ्या प्रमाणात फ्लेमिंगोंचे आगमन होते. यंदा या परदेशी पाहुण्यांचे आगमन लांबणीवर पडले.गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२३ मध्येच फ्लेमिंगोंचे आगमन झाले होते. परंतू यंदा डिसेंबरचा दुसरा आठवडा उलटला तरी अद्याप नवी मुंबई परिसरात फ्लेमिंगो आगमन झालेले नाही. फ्लेमिंगोंचे आगमन झाल्याचे व्हिडिओ वायरल झाल्याने फ्लेमिंगोंबाबतची उत्सुकता वाढली.नवी मुंबईतील डीपीएस तलाव तसेच नेरुळ एनआरआय तलाव तसेच टी एस चाणक्य तलाव हे फ्लेमिंगोंचे महत्वाचे अधिवास आहेत. दररोज टी. एस चाणक्य तलाव व नेरुळ एनआरआय तलाव येथे लाखो फ्लेमिंगोंचे आगमन या हंगामात होते. नवी मुंबई महा पालिका क्षेत्रात असलेल्या पाणथळ क्षेत्रात फ्लेमिंगोना भरपूर खाद्या मिळत असल्याने तेथे त्यांचा वावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो.

# रिलॅक्स गार्डन ते चक्की नाका जनआक्रोश मोर्चा.....




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

बांगलादेशमधील हिंदू धर्मियांवरील अत्याचार थांबविण्याच्या मागणीसाठी नवनिर्वाचित आमदार सौ सुलभाताई गणपत शेठ गायकवाड यांच्या संयोजनाने सकल हिंदू समाजातर्फे कल्याण पूर्वेत रिलॅक्स गार्डन नांदिवली ते चक्कीनाका असा जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्च्यात भारतीय जनता पार्टी,विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, इस्कॉन, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान, हिंदू जागरण मंच अशा विविध संस्था सहभागी झाल्या होत्या. बांग्लादेशातील मुस्लिम कट्टरतावाद्यांकडून हिंदू आणि अन्य अल्पसंख्यांक समुदायांवर गंभीर अत्याचार केले जात आहेत. मंदिरे, घरे, आणि दुकाने पेटवून दिली जात आहेत, हिंदू महिलांवर अमानवीय अत्याचार होत आहेत. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घ्यावी. हिंदू समाजावर होणारे अत्याचार थांबवावे आणि इस्कॉनच्या साधूंची तात्काळ मुक्तता करावी. आदी मागण्या या जन आक्रोश मोर्चात फलकाद्वारे करण्यात आल्या. या जन आक्रोश मोर्चाला सर्व हिंदू धर्मियांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोर्चामध्ये एकवटलेल्या हजारो हिंदु बांधवांनी हाती भगवे ध्वज आणि बांग्लादेश विरोधातील फलक झळकवले.या मोर्च्यात माननीय आमदार सौ सुलभाताई गणपत गायकवाड, जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी, कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे, मा उपमहापौर मोरेश्वर भोईर, नगर संघचालक डॉ उमेश कापुसकर, इस्कॉन महंत सारंगधरी दास, हिंदू सेवा संघ पूर्व संघचालक डॉ विवेक मोडक, निशा सिंग तसेच सर्व संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि असंख्य हिंदू बंधू भगिनी उपस्थित होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी